22 FEB 2025
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या कामकाजाचा राज्यपालांनी घेतला आढावा

कोल्हापूर, ता. २१ : राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज राजभवन मुंबई येथे शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यावेळी विद्यापीठासंदर्भात विस्तृत सादरीकरण केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, संशोधन व आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, भाषांतर प्रकल्पांतर्गत कार्य, आंतरवासिता कार्यक्रमाची अंमलबजावणी, अध्यापकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, क्रीडा सुविधांचा विकास, 'स्वच्छ भारत अभियान' व 'विकसित भारत' उपक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग, उद्योग क्षेत्राशी सहकार्य आदी विषयांवर चर्चा झाली. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.



कोल्हापूर : मुंबई येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांना करवीरनिवासिनी श्री. अंबाबाईची प्रतिमा भेट देत स्वागत केले. यावेळी शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, अजितसिंह जाधव उपस्थित होते.

22 FEB 2025 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी मुंबईतील राजभवन येथे शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रा. डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

# राज्यपालांनी घेतला विद्यापीठाचा आढावा

## संशोधन, प्लेसमेंटवर चर्चा : कुलगुरूंनी केले सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी मुंबईतील राजभवन येथे शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यावेळी विद्यापीठासंदर्भात विस्तृत सादरीकरण केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, संशोधन व आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, भाषांतर प्रकल्पांतर्गत कार्य, आंतरवासिता कार्यक्रमाची अंमलबजावणी, अध्यापकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, क्रीडा सुविधांचा विकास, 'स्वच्छ भारत अभियान' व विकसित भारत उपक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग, उद्योग क्षेत्राशी सहकार्य आदी विषयांवर यावेळी चर्चा झाली.

बैठकीला प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
पुढारी

# राधाकृष्णन यांनी घेतला विद्यापीठ कामकाजाचा आढावा

**कोल्हापूर :** राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शनिवारी राजभवन मुंबई येथे शिवाजी विद्यापीठाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी यावेळी विद्यापीठासंदर्भात विस्तृत सादरीकरण केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, संशोधन व आंतरराष्ट्रीय सहकार्य, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, भाषांतर प्रकल्पांतर्गत कार्य, आंतरवासिता कार्यक्रमाची अंमलबजावणी, अध्यापकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा, क्रीडा सुविधांचा विकास, 'स्वच्छ भारत अभियान' व विकसित भारत उपक्रमांमध्ये विद्यापीठाचा सहभाग, उद्योग क्षेत्राशी सहकार्य आदी विषयांवर यावेळी चर्चा झाली. बैठकीला प्र-कुलगुरू प्रा. प्रमोद पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन शाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

22 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी जाणून घेतले जीआयएस, ड्रोन तंत्रज्ञान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागात आयोजित कार्यशाळेत सहभागी शिक्षक आणि विद्यार्थी.

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागातर्फे 'भौगोलिक माहिती तंत्रज्ञानातील प्रगतिशिलता' या विषयावर कार्यशाळा झाली. त्यात विद्यार्थ्यांनी जीआयएस, ड्रोन तंत्रज्ञान जाणून घेतले.

या कार्यशाळेत कोल्हापूर जिल्ह्यातील न्यू कॉलेज, राजाराम महाविद्यालय, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर) आणि विजयसिंह यादव महाविद्यालय (पेठवडगाव) या महाविद्यालयांच्या निवडक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना आधुनिक जी.आय. एस. तंत्रज्ञान, ड्रोन तंत्रज्ञान आणि थ्रीडी-मॅपिंग आदी अत्याधुनिक संकल्पनांचा प्रात्यक्षिकांसह परिचय करून देण्यात आला. 'भूगोलाच्या अभ्यासकांच्या क्षेत्रीय अभ्यासात जी.आय.एस. आणि रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानासह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब अनिवार्य आहे.', असे प्रतिपादन विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी केले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ. अभिजित पाटील यांनी जिओस्पेशियल तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि संधी याविषयी माहिती दिली. वेब-जीआयएस, थ्रीडी-मॅपिंग, ड्रोन तंत्रज्ञान, थ्रीडी मॉडेलिंग, याविषयी डॉ. अभिजित पाटील, डॉ. सुधीर पोवार, ओंकार बिद्रे यांनी मार्गदर्शन केले. समारोप सत्रात डॉ. राजेखान शिकलगार, राजाराम पाटील, दिनेश भंडारे, एस. एस. टिकेकर, एन. डी. काशीद-पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्यापासून शिवस्पंदन महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव दि. २३ ते २५ फेब्रुवारी या काळात साजरा करण्यात येणार आहे. रविवारी (दि. २३) सकाळी ८ वाजता सांस्कृतिक शोभायात्रेने महोत्सवाला प्रारंभ होईल.

सकाळी १० वाजता प्राणीशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात येईल. त्यानंतर दिवसभरात रांगोळी व स्थळचित्र, सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा होतील.

सोमवारी (दि. २४) सकाळी ७.३० वाजता वाद्य महोत्सव साजरा करण्यात येईल. क्रांतिवन परिसर (गेट क्र. ८ जवळ), संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव परिसर, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळ्यासमोरील उद्यान, मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसर येथे देशभरातील विविध लोकवाद्यांच्या वादनाचा रसिकांना आनंद घेता येईल. दुपारी ४ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या सर्व लोकवाद्यांचे सामूहिक वादन करण्यात येईल. तसेच मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा होतील.

मंगळवारी (दि. २५) एकल नृत्य, समूहनृत्य स्पर्धा होतील. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होईल. याचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, महोत्सव समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव

## रांगोळी, स्थळचित्र, सुगम गायन, लोकवाद्य वादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात दि. २३ ते २५ फेब्रुवारीदरम्यान शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. रविवारी सकाळी ८ वाजता सांस्कृतिक शोभायात्रेने महोत्सवाला प्रारंभ होणार आहे.

रविवारी सकाळी १० वाजता प्राणीशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवस्पंदन महोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यानंतर दिवसभरात रांगोळी व स्थळचित्र, सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा होणार आहेत.

सोमवारी (दि. २४) सकाळी ७.३० वाजता वाद्यमहोत्सव कार्यक्रम होणार आहे. क्रांतीवन परिसर (गेट क्र. ८ जवळ), संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव परिसर, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळ्यासमोरील उद्यान, मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी



महाराज पुतळ्यासमोरील परिसर या ठिकाणी देशभरातील विविध लोकवाद्यांच्या वादनाचा रसिकांना आनंद घेता येईल. दुपारी ४ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सर्व लोकवाद्यांचे सामूहिक वादन करण्यात येईल. याच दिवशी मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका स्पर्धा होतील.

मंगळवारी (दि. २५) एकल नृत्य, समूह नृत्य स्पर्धा होतील. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होईल. या कार्यक्रमांचा रसिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले व महोत्सव समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी केले आहे.

22 FEB 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाचा शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सव रविवार (ता. २३) ते मंगळवार (ता. २५) दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. रविवारी सकाळी आठ वाजता सांस्कृतिक शोभायात्रेने महोत्सवाला प्रारंभ होईल.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात सकाळी दहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाचे उद्घाटन करण्यात येईल. त्यानंतर दिवसभरात रांगोळी व स्थळचित्र, सुगम गायन, एकल लोकवाद्य वादन आणि समूहगीत स्पर्धा होतील. सोमवारी (ता. २४) सकाळी साडेसात वाजता वाद्यमहोत्सव साजरा करण्यात येईल. क्रांतिवन परिसर (गेट क्र. ८ जवळ), संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलाव परिसर, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळ्यासमोरील उद्यान, मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोरील परिसर या ठिकाणी देशभरातील विविध लोकवाद्यांच्या वादनाचा रसिकांना आनंद घेता येईल. दुपारी चार वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात या सर्व लोकवाद्यांचे सामूहिक वादन करण्यात येईल. या दिवशी मूकनाट्य, नकला आणि लघुनाटिका या स्पर्धा होतील.

मंगळवारी (ता. २५) एकल नृत्य, समूह नृत्य स्पर्धा होतील. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होईल.

कार्यक्रमांचा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले आणि महोत्सव समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी केले आहे.

22 FEB 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विनोदासाठी निरीक्षण कला महत्त्वाची

## अभिनेते प्रसाद खांडेकर; विद्यापीठात युवा संवाद कार्यक्रम

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : 'यिन' व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित युवा संवाद कार्यक्रमात बोलताना लेखक अभिनेते प्रसाद खांडेकर. शेजारी अभिनेते रोहित माने, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

कोल्हापूर, ता. २१ : 'मानवी वर्तनातील विसंगतीतून विनोदनिर्मिती करण्यासाठी उत्तम निरीक्षण कला महत्त्वाची ठरते,' असे मत लेखक, अभिनेते प्रसाद खांडेकर यांनी आज येथे व्यक्त केले.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित युवा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. या वेळी अभिनेते रोहित माने उपस्थित होते. राजर्षी शाहू सभागृहात आयोजन केले होते.

श्री. खांडेकर म्हणाले, ''जीवनातील विसंगतीतून विनोदाची निर्मिती होती. ती नेमकेपणाने टिपणे हे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण असते. माणसांचे वागणे, बोलणे, त्यांच्या लकबींचे निरीक्षण करून त्यातून विनोद कसा साधता येईल, याचे ज्ञान आवश्यक ठरते. लेखनात निरीक्षणकला उतरली की, अभिनेत्यांना त्यावर काम करणे शक्य होते.''

कोल्हापूरला अनेकदा आलो असलो तरी प्रथमच शिवाजी विद्यापीठात येण्याचा आनंद मोठा असल्याचेही त्यांनी सांगितले.

लेखक, अभिनेते प्रथमेश शिवलकर म्हणाले, ''राष्ट्रीय सेवा योजनेत मी पाच वर्षे स्वयंसेवक म्हणून काम केले. अनेक राष्ट्रीय एकात्मता शिबिरांतही सहभागी झालो होतो. शिबिरांतील विविध सामाजिक उपक्रमांतून माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला. त्या बळावरच माझी अभिनयातील वाटचाल सुरू आहे.''

निर्माते-दिग्दर्शक सुनील नारकर म्हणाले, ''सुमारे अडतीस वर्षे अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये राहिल्यानंतर मायभूमीचे, अभिजात मराठी भाषेचे काही देणे लागतो, या भावनेतून मी मायदेशी परतलो आहे. आता चित्रपट निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.'

डॉ. शिंदे यांनी, अनेक प्रहसनांतून विनोदाची निर्मिती करून महाराष्ट्रवासीयांना पोट धरून हसायला लावण्याचे काम ही मंडळी करत असल्याचे सांगितले.

या प्रसंगी केंद्रीय युवा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव उपस्थित होते. संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक संचालक डॉ. अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. के. कीर्दत यांनी आभार मानले. यिन सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड, यिन प्रतिनिधी मोहन मोरे व अनोश कामत यांनी संयोजन केले.

22 FEB 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजच्या विसंगतीतून विनोदाची निर्मिती


- लेखक, अभिनेते, दिग्दर्शक प्रसाद खांडेकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

दैनंदीन जीवनातील, मानवी वर्तनातील विसंगतीमधून विनोदाची निर्मिती होते. ही विसंगती नेमकेपणाने टिपणे हे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण असते, असे प्रतिपादन लेखक, अभिनेते, दिग्दर्शक प्रसाद खांडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी आलेल्या स्वयंसेवकांशी संवाद साधताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. लेखक, अभिनेते प्रथमेश शिवलकर, रोहित माने यांच्यासह निर्मात-दिग्दर्शक सुनील नारकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

खांडेकर म्हणाले, चांगल्या विनोदनिर्मितीसाठी लेखक आणि अभिनेत्याकडे उत्तम निरीक्षणकला असावे लागते. त्यामधून माणसांचे वागणे, बोलणे, त्यांच्या लकबी इत्यादींचे त्याला ज्ञान होते. वागण्या-बोलण्यातली विसंगती टिपता आली पाहिजे. त्यातूनच चांगल्या विनोदाची निर्मिती होण्याची शक्यता वाढते. शिवलकर म्हणाले, राष्ट्रीय एकात्मता शिबिरांतून आत्मविश्वास निर्माण केला. त्या बळावरच माझी अभिनय क्षेत्रातली वाटचाल सुरू आहे. सुनील नारकर म्हणाले, सुमारे ३८ वर्षे अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये राहिल्यानंतर आपण आपल्या मायभूमीचे, अभिजात मराठी भाषेचे काही देणे लागतो, या भावनेतून देशात परतलो असून त्या भावनेतून येथे चित्रपट निर्मिती करण्याचा निर्णय घेतला.



कोल्हापूर : राष्ट्रीय एकात्मता शिबिरात संवाद साधताना अभिनेते दिग्दर्शक प्रसाद खाडेकर.

संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रादेशिक संचालक डॉ. अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. के. कीर्दत यांनी आभार मानले. यावेळी केंद्रीय युवा मंत्रालयाचे यूथ ऑफिसर सुमंतकुमार यादव होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
लोकमत

# विसंगती टिपणे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण : प्रसाद खांडेकर

## शिवाजी विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांशी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जीवनातील, मानवी वर्तनातील विसंगतीतून विनोदाची निर्मिती होते. ही विसंगती नेमकेपणाने टिपणे हे चांगल्या विनोदी लेखकाचे लक्षण असते, असे लेखक, अभिनेते, दिग्दर्शक प्रसाद खांडेकर यांनी शुक्रवारी सांगितले.

शिवाजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय एकात्मता शिबिरात स्वयंसेवकांशी संवाद साधताना ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते. लेखक, अभिनेते प्रथमेश शिवलकर, रोहित माने यांच्यासह निर्माते-दिग्दर्शक सुनील नारकर उपस्थित होते.

कोल्हापूरला अनेकदा आलो; पण यावेळी प्रथमच शिवाजी विद्यापीठात येत असल्याचा आनंद असल्याचे सांगून खांडेकर म्हणाले, चांगल्या विनोद निर्मितीसाठी लेखक व अभिनेत्याकडे



प्रसाद खांडेकर

उत्तम निरीक्षणकला असावी लागते. त्यातून माणसांचे वागणे-बोलणे, लकबी आदींचे त्याला ज्ञान होते. सुनील नारकर म्हणाले, सुमारे ३८ वर्षे अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये राहिल्यानंतर आपण आपल्या मायभूमीचे, अभिजात मराठी भाषेचे काही देणे लागतो, या भावनेतून देशात परतलो असून, त्या भावनेतून येथे चित्रपट निर्मिती करण्याचा निर्णय घेतला, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी स्वागत केले. डॉ. अजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. के. कीर्दत यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
पुढारी

# भूगोलच्या क्षेत्रीय अभ्यासात आधुनिक तंत्रज्ञान अनिवार्य : डॉ. पन्हाळकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भूगोलच्या अभ्यासकांच्या क्षेत्रीय अभ्यासात जी.आय.एस. आणि रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानासह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब अनिवार्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले. विद्यापीठाच्या भूगोल अधिविभाग आयोजित 'भौगोलिक माहिती तंत्रज्ञानातील प्रगतिशीलता' कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. पन्हाळकर म्हणाले, भूगोलाच्या विद्यार्थ्यांनी या आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. हे तंत्रज्ञानच भविष्यातील स्पर्धात्मक जगात अधिक संधी मिळवून देईल.

दिवसभर झालेल्या विविध सत्रांत वेब-जीआयएस, थ्रीडी-मॅपिंग, ड्रेन तंत्रज्ञान, थ्रीडी मॉडेलिंग याविषयी डॉ. अभिजीत पाटील, डॉ. सुधीर पोवार, ओंकार बिद्रे यांनी मार्गदर्शन केले. समारोप सत्रात डॉ. राजेखान शिकलगार, डॉ. राजाराम पाटील, डॉ. दिनेश भंडारे, डॉ. एस. एस. टिकेकर आणि डॉ. एन. डी. काशीद-पाटील यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
सकाळ

# विद्यार्थी विकास केंद्राचे सोमवारी भूमिपूजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन सोमवारी (ता. २४) दुपारी बारा वाजता पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठातील मुद्रणालय आणि सबस्टेशन क्रमांक एकजवळ होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

# विद्यापीठाचा ऋषिप्रसाद देसाई वेगवान धावपटू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करत विद्यापीठाच्या ऋषिप्रसाद देसाई याने स्पर्धेतील वेगवान धावपटूचा किताब मिळवला. विद्यापीठाच्या ४४०० मीटर रिले पुरुष आणि महिला संघांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तसेच महिला बास्केटबॉल संघानेही अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात १८ फेब्रुवारीपासून २६ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव सुरू आहे. या महोत्सवातील मैदानी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ऋषिप्रसाद देसाई याने १०० मीटर धावणे क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. त्याने सुवर्णपदकासह स्पर्धेतील वेगवान धावपटूचा किताब मिळवला. उंच उडीत समीक्षा अडसूळ हिने १.५५ मीटर उडी मारून सुवर्णपदक मिळवले. धैर्यशील गायकवाड याने २.०० मीटर उंच उडी मारून सुवर्णपदक, तर अथर्व धज याने १.९० मीटर उडी मारून रौप्यपदक मिळवले. तितिक्षा पाटोळे हिने १०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवला.

गोळाफेकीत ऋषीकेश साखरे याने १५.३६ मीटर फेक करत द्वितीय, प्रफुल्ल थोरात याने १४.५१ मीटर फेक करत तृतीय क्रमांक मिळवला. थाळीफेकीत निकिता शेवाळे हिने ३४.०२ मीटर फेक करत प्रथम क्रमांक मिळवला.



गडचिरोली : सुवर्णपदकासह वेगवान धावपटूचा किताब पटकावणारा शिवाजी विद्यापीठाचा खेळाडू ऋषिप्रसाद देसाई.

बॅडमिंटनमध्ये विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने शनिवारी सकाळच्या सत्रात अमरावतीच्या संत तुकडोजी महाराज विद्यापीठ संघावर २-० असा विजय मिळवला. त्यानंतर संध्याकाळच्या सत्रात मुंबईच्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठावर २-० असा विजय मिळवला. सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावरही २-० असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

22 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा ऋषिप्रसाद वेगवान धावपटू

## अन्य स्पर्धांतही कोल्हापूरचे खेळाडू चमकले

### राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा



कोल्हापूर : राज्य आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदकासह वेगवान धावपटूचा किताब पटकावणारा शिवाजी विद्यापीठाचा ऋषिप्रसाद देसाई मध्यभागी.

कोल्हापूर, ता. २१ : गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात सुरू असलेल्या राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा धावपटू ऋषिप्रसाद देसाई याने वेगवान धावपटूचा किताब पटकाविला, तर बॅडमिंटन, टेबल टेनिस स्पर्धेतही शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू चमकदार कामगिरी करीत आहेत. स्पर्धेत ४ बाय ४०० मीटर रिले पुरुष, महिला संघांनी, तर महिला बास्केटबॉल संघानेही अंतिम फेरी गाठली.

स्पर्धेत ऋषिप्रसादने मैदानी स्पर्धेत १०० मीटर धावणेमध्ये सुवर्णपदकासह वेगवान धावपटूचा किताब पटकावला. उंच उडीत समीक्षा अडसूळ हिने १.५५ मीटर उडी मारून सुवर्णदपक मिळवले, तर धैर्यशील गायकवाडने २.०० मीटर उंच उडी मारून सुवर्णपदक मिळवले. अथर्व धज याने १.९० मीटर उडी मारून रौप्यपदक मिळवले. तितिक्षा पाटोळेने १०० मीटर धावण्यात तिसरा क्रमांक मिळवला. गोळाफेकमध्ये ऋषिकेश साखरेने १५.३६ मीटर फेक करीत दुसरा क्रमांक पटकाविला. प्रफुल्ल थोरातने १४.५१ मीटर फेक करीत तिसरा क्रमांक मिळवला. थाळीफेकमध्ये निकिता शेवाळेने ३४.०२ मीटर फेक करीत पहिला क्रमांक मिळवला.

बॅडमिंटनमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने अमरावतीच्या संत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या संघावर दोन विरुद्ध शून्य असा विजय मिळवला. संध्याकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ संघाने मुंबईच्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावरही दोन विरुद्ध शून्य असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

टेबल टेनिस पुरुषांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने नागपूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाला हरवून अंतिम फेरी गाठली. महिला बॉस्केटबॉल संघाने उपांत्य फेरीत मुंबई विद्यापीठावर ५१-३९ असा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला.

खेळाडूंना पथकप्रमुख डॉ. एन. डी. पाटील, प्रशिक्षक डॉ. सुनील चव्हाण, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. सजय पाटील, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. श्रीदेवी पवार, डॉ. गणेश सिंहासने, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. रमेश पाटील, डॉ. संदीप पाटील, रुद्रेश शिवपुलजी आदींचे मार्गदर्शन लाभले.

22 FEB 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची शानदार कामगिरी

## राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा : उंच उडीत समिक्षा तर गोळाफेकमध्ये निकिताला सुवर्ण



कोल्हापूर : राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत बास्केटबॉलच्या अंतिम फेरीत पोहोचलेला शिवाजी विद्यापीठाचा महिला बास्केटबॉल संघ.

प्रतिनिधी
कोल्हापूर

गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात सुरु असलेल्या २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. विद्यापीठाच्या ऋषीप्रसाद देसाईने स्पर्धेतील १०० मीटर धावणे स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवत सुवर्ण पदकाला गवसणी घालतानाच वेगवान धावपटूचाही किताब पटकावला. तसेच उंच उडी स्पर्धेत समीक्षा अडसूळने १.५५ मीटर उडी घेऊन व धैर्यशील गायकवाडने २.०० मीटर उंच उडी घेऊन सुवर्ण पदक प्राप्त केले. अथर्व धजनेही १.९० मीटर उडी घेऊन रौप्य पदक मिळवले. याचबरोबर महिला धावपटू तितिक्षा पाटोळेने १०० मीटर धावणे स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळविला.

गोळाफेक स्पर्धमध्ये ऋषिकेश साखरेने १५.३६ मीटर गोळा फेकत रौप्य तर प्रफुल्ल थोरातने १४.५१ मीटर गोळा फेकत कांस्य पदक मिळवले. थाळी फेक स्पर्धेत निकिता शेवाळेनेही आपल्या धमक दाखवून ३४.०२ मीटर इतक्या लांब थाळी फेकून सुवर्ण पदक प्राप्त केले. बॅडमिंटनमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने अमरावतीच्या संत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या संघावर २-० गुणांनी विजय मिळवला. संध्याकाळी झालेल्या दुसऱ्या सामन्यातही शिवाजी विद्यापीठाच्या संघाने मुंबईच्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाला २-० गुणांनी पराभूत केले. यानंतर उपांत्यपुर्व सामना खेळतानाही शिवाजी विद्यापीठ संघाने उत्कृष्ट खेळत सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाला २-० गुणांनी मात देत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

टेबल टेनिस (पुरुष) स्पर्धेमध्येही शिवाजी विद्यापीठाच्या संघाने बलाढ्य नागपूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ संघाला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. शिवाजी विद्यापीठाच्या महिला बास्केटबॉल संघानेही उपांत्य फेरीत मुंबई विद्यापीठावर ५१-३९ अशा गुणफरकांनी विजय मिळवत अंतिम फेरीत धडक दिली आहे. याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष आणि महिला संघानेही वेगवान कागगिरी करत ४ बाय ४०० मीटर रिलेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. वरील सर्व यशस्वी खेळाडूंना पथक प्रमुख डॉ. एन. डी. पाटील, प्रशिक्षक डॉ. सुनिल चव्हाण, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. संजय पाटील, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. श्रीदेवी पवार, डॉ. गणेश सिंहासने, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. रमेश पाटील, डॉ. संदीप पाटील, रुद्रेश शिवपूलजी आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2025
तरुण भारत



कोल्हापूर : जीआयएस प्रयोगशाळेत प्रात्यक्षिकांची माहिती घेताना विद्यार्थिनी.

# भूगोलच्या क्षेत्रीय अभ्यासात आधुनिकतेची गरज : डॉ. पन्हाळकर

प्रतिनिधी
कोल्हापूर

भूगोलाच्या अभ्यासकांच्या क्षेत्रीय अभ्यासात जीआयएस आणि रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब अनिवार्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात भूगोल अधिविभागाच्या वतीने 'भौगोलिक माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीशीलता' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेत कोल्हापूर जिल्ह्यातील न्यू कॉलेज, राजाराम महाविद्यालय, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर) आणि श्री विजयसिंह यादव महाविद्यालय (पेठवडगाव) या महाविद्यालयांच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.विविध सत्रांत वेब-जीआयएस, थ्रीडी-मॅपिंग, ड्रेन तंत्रज्ञान, थ्रीडी मॉडेलिंग, विषयी डॉ. अभिजीत पाटील, डॉ. सुधीर पोवार, ओंकार बिद्रे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. राजेखान शिकलगार, डॉ. राजाराम पाटील, डॉ. दिनेश भंडारे, डॉ. एस. एस. टिकेकर आणि डॉ. काशीद-पाटील यांनी अनुभव सांगितले.